# MAHARASHTRA ELECTRICITY REGULATORY COMMISSION

MERC

**Office:** 13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai-400 005
**Tel.** 022 22163964/65/69, **E-Mail:** mercindia@merc.gov.in,
**Website:** www.merc.gov.in

**Advertisement No. 21/2020-21**

## PUBLIC NOTICE

**[Case No 190 of 2020]**
**Inviting Suggestions/Objections on Application of Adani Electricity Mumbai Infra Ltd.'s Application for grant of Transmission Licence**

1. Adani Electricity Mumbai Limited-Transmission (AEML-T) and Adani Electricity Mumbai Infra Ltd. (AEMIL) has filed a joint Application for grant of Transmission Licence in the name of AEMIL before the Maharashtra Electricity Regulatory Commission (the Commission) under the provisions of Section 14 read with Section 15 of the Electricity Act, 2003 and MERC (Transmission Licence Conditions) Regulations, 2004. The Commission has admitted the Application on **28 November, 2020** and directed AEMIL to publish a public notice under Section 15 (2) of the Act.
2. Applicants reasoning for the grant of Transmission Licence:
   a. AEML-T has been in the process of implementing the 1000 MW High Voltage Direct Current (HVDC) (Voltage Source Converter (VSC) based) Link between 400 kV Maharashtra State Electricity Transmission Company Ltd.'s (MSETCL) Kudus Extra High Voltage (EHV) substation and 220 kV AEML Aarey EHV substation since 2011.
   b. However, due to certain unforeseen financing and implementation constraints, AEML-T has proposed to execute the HVDC Scheme under its 100% owned subsidiary Company, AEMIL.
   c. Accordingly, AEMIL and AEML-T have filed the Petition in Case No. 190 of 2020 jointly before the Commission with the prayer for granting HVDC Scheme Licence to AEMIL.
3. AEML-T has filed a Miscellaneous Application on 21 September, 2020 requesting amendment to Case No.195 of 2019. AEML-T has requested to delete the proposed HVDC scheme proposed in Case No.195 of 2019 as the same is being considered in Case No. 190 of 2020 separately.
4. Description of the project for which Transmission Licence Application has been filed before the Commission is as under :

**A.Proposed System – 400 kV Transmission**

| Sr. No. | Proposed System - Transmission line | Line length in Ckt. Kms. (estimated) |
|---|---|---|
| **A.** | **Proposed System – 400 kV Transmission** | |
| 1. | 400kV MSETCL Kudus-AEML Kudus transmission line 1 | 1 |
| 2. | 400kV MSETCL Kudus-AEML Kudus transmission line 2 | 1 |
| **B.** | **Proposed System – 220 kV Transmission** | |
| 1. | 220 kV AEML Aarey-HVDC Aarey line-1 | 1 |
| 2. | 220 kV AEML Aarey-HVDC Aarey line-2 | 1 |
| **C.** | **Proposed System – HVDC Transmission lines** | |
| 1. | +/- 320 kV HVDC Underground Cable Aarey-Kudus (route length - 80 kms) | 80 |

**B.Number of Bays of Proposed System**

| Sr. No. | Proposed System - Transmission lines | No. of Bays (estimated) |
|---|---|---|
| **A.** | **Proposed System - List of EHV Substation Bays - 220 kV** | |
| 1. | 220 kV Aarey EHV Station (HVDC Connectivity) | 9 |
| **B.** | **Proposed System - List of EHV Substation Bays - 400 kV** | |
| 1. | 400 kV AEML-Kudus (HVDC Connectivity) | 14 |

5. In accordance with sub-section (2) of Section 15 of the Electricity Act, 2003 read with Regulation 6 of MERC (Transmission Licence Conditions) Regulations, 2004, AEMIL published a notice of its Transmission Licence application on 1 December, 2020 in two English newspapers, viz. 'Hindustan Times' & 'Indian Express' and two Marathi newspapers, viz. 'Loksatta' & 'Saamna'.
6. Pursuant to the notice published by AEMIL of the aforesaid application in newspapers, suggestions and objections were received from Shri Sharadkumar Shah, The Tata Power Company Ltd.- Transmission (TPC-T), The Tata Power Company Ltd.- Distribution (TPC-D) and L&T Infrastructure Development Projects Ltd. (L&TIDPL).
7. The HVDC scheme is part of STU's five year plan from FY 2019-20 to FY 2024-25 and is also recommended by the CEA vide its letters dated 13 June, 2019 and 23 October,2020. STU vide its letter dated 10 Decemebr,2020 has submitted the DPR of 1000 MW HVDC for in-principle approval of the Commission for treating it as part of InSTS plan.
8. After evaluation of the application and documents submitted by AEMIL, the Commission is prima facie satisfied that AEMIL qualifies for the grant of Transmission Licence under Alternate 2 of Part II of MERC (Transmission Licence Conditions) Regulations, 2004 and its Amendment, subject to fulfillment of the requirements laid down in the Electricity Act, 2003 and Regulations.
9. Notice is hereby published in pursuant to clause (a) of Section 15(5) of the Electricity Act 2003 to invite suggestions and / or objections, if any, to the proposal to grant Transmission Licence to the applicant by the Commission.
10. A copy of AEMIL's Application along with its Annexures and Enclosures can be accessed at the Commission's website **www.merc.gov.in** or inspected by any person in the Commission's office in accordance with the procedure laid down in MERC (Conduct of Business) Regulations, 2004.
11. In response to the Public Notice published, every person who intends to file suggestions/ objections can submit the same in English or Marathi language in writing through electronic means/Email: **ehearing@merc.gov.in / secretary@merc.gov.in,** addressed to "The Secretary, Maharashtra Electricity Regulatory Commission, 13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai 400 005, **within 21 days from the date of publication of this Notice (Last Date: 27 January 2021 at 5 pm).** Suggestions and/or objections received after the specified date shall not be considered.
12. If the sender/objector who has submitted his comments/suggestions as per Para 11 above and wants to be heard in person in e-Public Hearing, then he should specifically mention the same at the time of filing of suggestions /objections. In such cases, submission of valid email ID and Mobile Number would be mandatory. The Commission at its sole discretion, may permit such sender/objector to be heard in the e-Public Hearing. All participants attending the e- Public Hearing shall follow the provisions of the Commission's Guidelines for attending Public Hearing Through Video Conference notified on 17 September,2020.
13. E-Public Hearing to be held through video conference on **29 January, 2021 (Friday) at 10.30 hrs,** when AEMIL's application for grant of Transmission Licence will be considered. No separate notice will be issued for the purpose.

**Date: 6 January, 2021**
**Place: Mumbai**

**Sd/-**
**Secretary, MERC**

**Size : 12 (W) x 31 (H)**

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

म वि नि आ

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
**दूरध्वनी:** ०२२१६३९६४/२२१६३९६५ / २२१६३९६९
**संकेत स्थळ:** www.merc.gov.in **ई-मेल:** mercindia@merc.gov.in

**जाहिरात क्र. २१/२०२०-२१**

## जाहीर सूचना

**[सन २०२० चे प्रकरण क्र. १९०]**
**अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई इन्फ्रा लिमिटेडने पारेषण परवाना मंजूर करण्यासाठी केलेल्या अर्जावर सूचना/हरकती मागविण्यासाठी**

१. अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड – पारेषण (एइएमएल-टी) आणि अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई इन्फ्रा लि. (एइएमआयएल) यांनी एइएमआयएलच्या नावे पारेषण परवाना मंजूर करण्यासाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १५ सह कलम १४ आणि मविनिआ (पारेषण परवान्याच्या अटी) विनियम, २००४ मधील तरतुदींतर्गत संयुक्त अर्ज दाखल केला आहे. आयोगाने दि. २८ नोव्हेंबर, २०२० रोजी सदर अर्ज दाखल करुन घेतला आणि अधिनियमाच्या कलम १५(२) अंतर्गत जाहीर नोटीस प्रसिध्द करण्याचे निर्देश दिले.

२. अर्जदारांनी पारेषण परवान्याच्या मंजुरीसाठी खालील कारणे दिली आहेत –

अ. एइएमएल-टी सन २०११ पासून, ४०० केव्ही महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड (महापारेषण कंपनी) कुडुस अति उच्च दाब (इएचव्ही) उपकेंद्र आणि २२० केव्ही एइएमएल आरे इएचव्ही उपकेंद्र, १००० मेगावॅट हाय व्होल्टेज डायरेक्ट करंट (एचव्हीडीसी) (व्होल्टेज सोर्स कन्व्हर्टरवर आधारित (व्हीएससी)) वाहिनीद्वारे जोडण्याचे काम करण्याची प्रक्रिया चालू होती.

ब. तथापि, काही वित्तीय आणि अंमलबजावणी विषयक अनपेक्षित अडचणींमुळे एइएमएल-टी ने, एइएमआयएल या त्यांच्या स्वतःच्या १०० टक्के मालकीच्या उपकंपनीद्वारे एचव्हीडीसी योजना कार्यान्वित करण्याचे प्रस्तावित केले आहे.

क. त्यानुसार, एइएमआयएल आणि एइएमएल-टी यांनी सन २०२० च्या प्रकरण क्र. १९० अंतर्गत एइएमआयएलला एचव्हीडीसी योजनेचा परवाना मंजुर करण्यात यावा यासाठी आयोगाकडे संयुक्त याचिका दाखल केली आहे.

३. एइएमएल-टी ने दि. २१ सप्टेंबर, २०२० रोजी सन २०१९ च्या प्रकरण क्र. १९५ मध्ये सुधारणा करण्याची विनंती करणारा संकीर्ण अर्ज दाखल केला आहे. सन २०२० च्या प्रकरण क्र. १९० मध्ये एचव्हीडीसी योजना स्वतंत्रपणे विचारात घेण्यात आल्यामुळे, एइएमएल-टी ने सन २०१९ च्या प्रकरण क्र. १९५ अंतर्गत प्रस्तावित केलेली एचव्हीडीसी योजना रद्द करण्याची विनंती केली आहे.

४. आयोगाकडे ज्यासाठी पारेषण परवाना अर्ज दाखल केला आहे त्या प्रकल्पाची माहिती खालीलप्रमाणे आहे :

**अ. प्रस्तावित यंत्रणा – ४०० केव्ही पारेषण**

| अनु. क्र. | प्रस्तावित यंत्रणा – पारेषण वाहिन्या | सर्कीट किमी. मध्ये वाहिनीची लांबी (अंदाजित) |
|---|---|---|
| **अ** | **प्रस्तावित यंत्रणा – ४०० केव्ही पारेषण** | |
| १ | ४०० केव्ही महापारेषण कंपनी कुडुस- एइएमएल कुडुस पारेषण वाहिनी १ | १ |
| २ | ४०० केव्ही महापारेषण कंपनी कुडुस-एइएमएल कुडुस पारेषण वाहिनी २ | १ |
| **ब** | **प्रस्तावित यंत्रणा – २२० केव्ही पारेषण** | |
| १ | २२० केव्ही एमइएमएल आरे-एचव्हीडीसी आरे वाहिनी – १ | १ |
| २ | २२० केव्ही एमइएमएल आरे-एचव्हीडीसी आरे वाहिनी – २ | १ |
| **क** | **प्रस्तावित यंत्रणा – एचव्हीडीसी पारेषण वाहिन्या** | |
| १ | +/- ३२० केव्ही एचव्हीडीसी भूमिगत केबल आरे-कुडुस (मार्गाची लांबी – ८० किमी.) | ८० |

**बी. प्रस्तावित यंत्रणेच्या बेजची संख्या**

| अनु. क्र. | प्रस्तावित यंत्रणा – पारेषण वाहिन्या | बेजची संख्या (अंदाजित) |
|---|---|---|
| **अ** | **प्रस्तावित यंत्रणा – २२० केव्ही – अति उच्च दाब उपकेंद्र बेजची यादी** | |
| १ | २२० केव्ही आरे इएचव्ही केंद्र (एचव्हीडीसी कनेक्टिव्हिटी) | ९ |
| **ब** | **प्रस्तावित यंत्रणा – ४०० केव्ही – अति उच्च दाब उपकेंद्र बेजची यादी** | |
| १ | ४०० केव्ही एइएमएल – कुडुस (एचव्हीडीसी कनेक्टिव्हिटी) | १४ |

५. एइएमआयएलने, मविनिआ (पारेषण परवान्याच्या अटी) विनियम, २००४ सह विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १५ च्या उप-कलम (२) नुसार, आपल्या पारेषण परवाना अर्जाची सूचना 'हिन्दुस्थान टाइम्स' आणि 'इंडियन एक्सप्रेस' या दोन इंग्रजी वृत्तपत्रांमध्ये आणि 'लोकसत्ता' आणि 'सामना' या दोन मराठी वृत्तपत्रांमध्ये दि. १ डिसेंबर, २०२० रोजी प्रसिध्द केली आहे.

६. एइएमआयएलने उपरोक्त अर्जाबाबत वृत्तपत्रांमध्ये दिलेल्या सूचनेच्या संदर्भात श्री शरदकुमार शाह, टाटा पॉवर कंपनी लि. – पारेषण (टीपीसी-टी), टाटा पॉवर कंपनी लि. – वितरण (टीपीसी-डी) आणि एल ॲण्ड टी इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट प्रोजेक्ट्स लि. (एल ॲण्ड टीआयडीपीएल) यांच्याकडून सूचना आणि हरकती प्राप्त झाल्या आहेत.

७. सदर एचव्हीडीसी योजना एसटीयुच्या आर्थिक वर्ष २०१९-२० ते २०२४-२५ पर्यंतच्या पंचवार्षिक योजनेचा एक भाग आहे आणि केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने (सीइए) दि. १३ जून, २०१९ आणि २३ ऑक्टोबर, २०२० रोजी पाठविलेल्या पत्रान्वये देखील या योजनेची शिफारस केली आहे. राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा योजनेचा एक भाग म्हणून त्यास आयोगाची तत्वतः मान्यता मिळविण्यासाठी एसटीयुने दि. १० डिसेंबर, २०२० रोजी पाठविलेल्या पत्रान्वये १००० मेगावॅट एचव्हीडीसीचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) सादर केला आहे.

८. एइएमआयएलने सादर केलेल्या अर्जाचे आणि दस्तऐवजांचे विश्लेषण केल्यानंतर, आयोगाची सकृतदर्शनी खात्री झाली आहे की, वेळोवेळी सुधारणा केलेल्या मविनिआ (पारेषण परवान्याच्या अटी) विनियम, २००४ च्या भाग २ मधील पर्याय २ अंतर्गत एइएमआयएल, विद्युत अधिनियम, २००३ आणि विनियमांमधील आवश्यकतांची पूर्तता करण्याच्या अधीन राहून, पारेषण परवाना मंजुरीसाठी पात्र आहे.

९. विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम (१५)(५) च्या खंड (ए) अंतर्गत आयोगाने अर्जदाराला पारेषण परवाना मंजूर करण्याच्या प्रस्तावासंबंधात सूचना आणि/किंवा हरकती, असल्यास, त्या मागविण्यासाठी याद्वारे सूचना देण्यात येत आहे.

१०. एइएमआयएलने आयोगाला सादर केलेल्या अर्जाची प्रत त्यासोबतच्या जोडपत्र आणि सहपत्रांसह आयोगाच्या **www.merc.gov.in** या संकेत-स्थळावर किंवा कोणत्याही व्यक्तिला, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (कामकाज प्रचालन) विनियम, २००४ मध्ये विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीचे पालन करुन आयोगाच्या कार्यालयात पाहता येईल.

११. प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहीर सूचनेच्या संबंधात, इच्छुक व्यक्तिंनी ही **सूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून (अंतिम दिनांक : २७ जानेवारी, २०२१ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत) २१ दिवसांच्या आत** त्यांच्या सूचना/हरकती, असल्यास, इंग्रजी किंवा मराठी भाषेत, सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांना १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई – ४००००५ या पत्त्यावर इलेक्ट्रॉनिक माध्यम/ **ehearing@merc.gov.in/secretary@merc.gov.in** ई-मेलद्वारे पाठवाव्यात. विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकानंतर प्राप्त झालेल्या सूचना आणि/किंवा हरकती विचारात घेण्यात येणार नाहीत.

१२. वरील परिच्छेद ११ नुसार, अभिप्राय/हरकती पाठविणाऱ्या व्यक्तिला त्याचे म्हणणे जाहीर ई-सुनावणीमध्ये व्यक्तिशः आयोगासमोर मांडावयाचे असल्यास सूचना/हरकती दाखल करताना तसे विशेषत्वाने नमूद करावे. अशा प्रकरणी, वैध ई-मेल आयडी आणि मोबाईल क्रमांक देणे अनिवार्य राहील. आयोग, आपल्या स्वेच्छा निर्णयानुसार, अशा प्रेषक/आक्षेपकाला ई-सुनावणीमध्ये त्याचे म्हणणे मांडण्याची परवानगी देईल. जाहीर ई-सुनावणीत भाग घेणाऱ्या सर्व व्यक्ती आयोगाने दि. १७ सप्टेंबर, २०२० रोजी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे जाहीर सुनावणीस हजर राहण्यासाठी अधिसूचित केलेल्या मार्गदर्शक सूचनांमधील तरतुदींचे पालन करतील.

१३. **दि. २९ जानेवारी, २०२१ (शुक्रवार) रोजी १०.३० वाजता** व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे घेण्यात यावयाच्या ई-सुनावणीमध्ये एइएमआयएलच्या पारेषण परवान्याच्या मंजुरीसाठीचा अर्ज विचारात घेण्यात येईल. या प्रयोजनासाठी वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

**दिनांक: ६ जानेवारी, २०२१**
**ठिकाण: मुंबई**

**सही/-**
**सचिव, मविनिआ**

**Size : 12 (W) x 31 (H)**